# सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती.

शासकीय तंत्रनिकेतन परिस्र, गाडगेनगर, अमरावती

## (मागासवर्गीय अनुशेष विशेष भरती )

खालील नमूद केलेली रिक्त पदे (अनुशेष विशेष भरती अभियाना अंतर्गत) त्यांच्यासमोर दर्शविलेल्या पात्रते व निकषाप्रमाणे भरण्यासाठी पात्र उमेदवारांनी जाहिरातीमध्ये प्रकाशित करण्यात आलेल्या विहित नमून्यात भरलेले परिपूर्ण अर्ज **सहसंचालक तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय, अमरावती यांच्या कार्यालयात दिनांक ५/१/२०१२ पर्यत कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी ११.०० ते १७.०० वाजेपर्यत स्विकारण्यात येतील.** नमूद केलेल्या दिनांकानंतर व टपालाचे दिरंगाईमुळे उशिरा प्राप्त झालेले अर्ज स्वेकारले जाणार नाहीत, याची नोंद घ्यावी.

जाहिरातीमध्ये नमूद करण्यात आलेली पदे अमरावती, यवतमाळ, अकोला, वाशिम व बुलढाणा जिल्हयातील आहेत. प्राप्त झालेल्या अर्जाची छाननी करुन जे उमेदवार लेखी परिक्षेकरीता पात्र ठरतील अशा उमेदवारांना लेखी परीक्षेचे तपशिलासह मुलाखतपत्र देण्यात येईल. जाहिरातीत नमूद केलेल्या पदांची संख्या कमी जास्त होऊ शकते. तसेच वेळ प्रसंगी पद भरती काही कारणास्तव रद्द सुध्दा केल्या जाऊ शकते, पद भरती रद्द झाल्यास निवड केलेल्या उमेदवारांचा नियुक्तीकरीता कोणताही हक्क राहणार नाही, याची जाणिव सुध्दा याद्वारे उमेदवारांना करुन देण्यात येत आहे. या बाबतचे सर्व अधिकार सहसंचालकांना असतील.

| अ. क्र. | पदाचे नांव | पदाची वेतन श्रेणी रुपये | पदांची संख्या | अ रक्षित पदसंख्या | आवश्यक शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|---|---|---|
| १ | कातारी | पे.बँड रु. ५२००-२०२००/- (ग्रेड पे रु २४००/- ) | २ | १ पद - अ.जा. (SC)<br>१ पद -अ.जमाती (ST) | * माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (१० वी उत्तीर्ण<br>* आय.टी.आय कातारी ट्रेड उत्तीर्ण<br>अनुभवास प्राधान्य राहील. |
| २ | सहाय्यक ग्रंथपाल | पे.बँड रु. ५२००-२०२००/- (ग्रेड पे रु २०००/- ) | १ | १ पद- अ.ज्माती (ST) | * माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (१० वी उत्तीर्ण )<br>* ग्रंथालय पालन प्रमाणपत्र (C.Lib. Sc.)उत्तीर्ण<br>* शासन मान्य ग्रंथालयामध्ये कमीत कमी एक वर्ष ग्रंथपाल/सहाय्यक ग्रंथपाल म्हणून काम केल्याचा अनुभव |
| ३ | लिपीक नि टंकलेखक | पे.बँड रु. ५२००-२०२००/- (ग्रेड पे रु १९००/- ) | ५ | १ पद - अ.जाती (SC)<br>२ पदे - अ.जमाती (ST)<br>१ पद - वि जा (अ) (VJ)<br>१ पद - भ ज (ब)(NT-B) | * माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (१० वी उत्तीर्ण )<br>* इंग्रजी टंकलेखन ४० श. प्र. मि.<br>* मराठी टंकलेखन ३० श. प्र. मि. |
| ४ | वाहन चालक | पे.बँड रु. ५२००-२०२००/- (ग्रेड पे रु १९००/-) | १ | १ पद- ईमाव (OBC) | * किमान ४ था वर्ग उत्तीर्ण मराठी व हिंदी भाषा बोलता येणे आवश्यक<br>*जड वाहन किंवा मोटरकार किंवा जीप चालविण्याचा परवाना<br>*किमान ३ वर्ष वाहन (मोटरकार/जीप) चालविण्याचा अनुभव आवश्यक<br>*वाहन (मोटरकार/जीप) दुरुस्तीचे ज्ञान असणे आवश्यक<br>*संबंधीत क्षेत्राची भौगोलीक माहिती व शारिरीक स्थिती चांगली असणे आवश्यक. |
| ५ | हमाल | पे बँड रु. ४४४०-७४४०/- (ग्रेड पे रु १३००/- ) | ३ | १ पद - अ जाती (SC)<br>१ पदे - अ.जमाती(ST)<br>१ पद - वि जा (अ)(VJ) | * किमान ४ था वर्ग उत्तीर्ण.<br>* हमालाचे काम करण्यास सक्षम असणे आवश्यक. |

**<u>वयोमर्यादा</u>:- उमेदवाराचे वय दिनांक ३१.१२.२०११ रोजी किमान १८ वर्षापेक्षा कमी व कमाल ३८ वर्षापेक्षा जास्त नसावे.**

**<u>महत्वाच्या सुचना</u>**

| | |
|---|---|
| १ | उमेदवारांनी सोबतच्या विहित नमुन्यात A4 Size Paper वर प्रत्येक पदाकरीता स्वतंत्र अर्ज करावा. |
| २ | अ.क्र. १ ते ३ व अ.क्र. ५ चे पदांकरीता लेखी परीक्षा अनिवार्य आहे. तसेच लेखी परीक्षेमध्ये उत्तीर्ण होण्याकरीता ४५% गुण आवश्यक |
| ३ | अ.क्र.४ चे पदाकरीता व्यावसायीक चाचणी (ड्रायव्हींग चाचणी )घेण्यात येईल व जे उमेदवार व्यावसायीक चाचणीमध्ये पात्र ठरतील अशा उमेदवारापैकी गुणाणुक्रमे मुलाखतीकरीता रिक्त पदांच्या प्रमाणात उमेदवारांची संख्या मर्यादीत करण्यात येईल. जे उमेदवार मुलाखतीस पात्र ठरतील अशा उमेदवारांनी मुलाखतीस हजर असणे बंधनकारक अहे. |
| ४ | अ.क्र. १ चे पदाकरीता लेखी परिक्षे व्यतीरिक्त व्यावसायीक चाचणी व मुलाखत घेण्यात येईल. |
| ५ | अ.क्र. १ चे पदाकरीता लेखी व व्यावसायीक चाचणी परिक्षेत मिळालेल्या एकूण [illegible] चे आधारे मुलाखतीकरीता रिक्त पदाचे प्रमाणात उमेदवारांची संख्या मर्यादीत करण्यात येईल. |

Created with nitro PDF professional
download the free trial online at nitropdf.com/professional

| | |
|---|---|
| ६ | अ.क्र. १ चे पदाची अंतिम गुणवत्ता यादी लेखी परीक्षा+व्यावसायीक चाचणी + मुलाखत यांच्या एकूण गुणावरुन ठरविण्यात येईल. |
| ७ | अ.क्र. १ चे पदाकरीता लेखी परीक्षा १०० गुणांची, ही मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान व अंकगणीत या विषयावरील प्रश्नांकरीता समान गुण ठेवून वस्तूनिष्ठ/बहुपर्यायी लेखी परीक्षा घेण्यात येईल. |
| ८ | अ.क्र. २ चे पदाकरीता लेखी परीक्षा २०० गुणांची, ही मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान व अंकगणीत या विषयावरील प्रश्नांकरीता समान गुण ठेवून वस्तूनिष्ठ/बहुपर्यायी लेखी परीक्षा घेण्यात येईल. लेखी परिक्षेत मिळालेल्या गुणांचे आधारे रिक्त पदांच्या प्रमाणात उमेदवारांची संख्या गुणवत्तेनुसार मर्यादित करुन त्यांच उमेदवाराची २५ गुणाकरीता मुलाखत घेण्यात येईल. तसेच अंतिम गुणवत्ता यादी लेखी परीक्षा + मुलाखत यांच्या एकूण गुणावरुन ठरविण्यात येईल. |
| ९ | अ.क्र. ३ चे पदाकरीता लेखी परीक्षा २०० गुणांची, ही मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान व अंकगणीत या विषयावरील प्रश्नांकरीता समान गुण ठेवून वस्तूनिष्ठ/बहुपर्यायी लेखी परीक्षा घेण्यात येईल. लेखी परिक्षेत प्राप्त गुणांचे आधारे गुणानुक्रमे अंतिम गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल. |
| १० | अ.क्र. ४ चे पदाची अंतिम गुणवत्ता यादी व्यावसायीक चाचणी + मुलाखत यांच्या एकूण गुणावरुन ठरविण्यात येईल. |
| ११ | अ.क्र. ५ चे पदाकरीता लेखी परीक्षा ७५ गुणांची ही सामान्य ज्ञान/विभागीय भौगोलीक ज्ञान या विषयावर ठेवून वस्तूनिष्ठ/बहुपर्यायी लेखी परीक्षा घेण्यात येईल. लेखी परिक्षेत मिळालेल्या गुणांचे आधारे रिक्त पदाच्या प्रमाणात उमेदवारांची संख्या गुणवत्तेनुसार मर्यादित करुन त्यांच उमेदवाराची २५ गुणाकरीता मुलाखत घेण्यात येईल. तसेच अंतिम गुपवत्ता यादी लेखी परीक्षा + मुलाखत यांच्या एकूण गुणावरुन ठरविण्यात येईल. |
| १२ | अर्जासोबत शैक्षणिक अर्हता, वय, जातीचा दाखला, अनुभव प्रमाणपत्र, नॉनक्रिमिलेअर प्रमाणपत्र व महाराष्ट्र राज्याचा रहिवाशी असल्याबाबतचे प्रमाणपत्र व इत्यादीच्या साक्षांकित प्रती जोडणे आवश्यक आहे. तसे न केल्यास अर्ज अपूर्ण समजून नाकारण्यात येईल. |
| १३ | विजाअ, भजब,ईमाव उमेदवारांनी दिनांक १.४.२०११ नंतरचे निर्गमित केलेले उन्नत व प्रगत प्रवर्गात मोडत नसल्याबाबतचे **नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र** अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. किंवा ते जाहिरातीच्या दिनांकास वैद्य असणे आवश्यक आहे. अन्यथा अर्ज रद्य करण्यात येईल. |
| १४ | वरील १ ते ३ चे पदाकरीता उमेदवाराने संगणक हाताळणी/वापराबाबतचे विहित प्रमाणपत्र (DOEACC सोसायटीच्या अधिकृत C,C,C किंवा O स्तर किंवा B स्तर किंवा C स्तर या पैकी कोणतीही एक परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण मंडळ मुंबई यांचेकडील अधिकृत MS-CIT परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र) अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. विहित प्रमाणपत्र उपलब्ध नसल्यास सा.प्र. विभागाचे शासन नि.क्र. प्रशिक्षण २०००/ प्र.क्र. ६१/२००१/३९/१९.३.२००३ नुसार नियुक्तीच्या दिनांकापासून २ वर्षाच्या आत विहित प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. विहित मुदतीत संगणक हाताळणी/वापराबाबतचे विहित प्रमाणपत्र सादर न केल्यास तात्काळ सेवा समाप्त करण्यात येतील. |
| १५ | वरील अ.क्र. १ ते ४ चे पदाचे अर्जासोबत रु. १००/- चा व अ.क्र- ५ चे पदाकरीता रु. ७५/- चा **सहसंचालक तंत्र शिक्षण, अमरावती Payable at Amravati. यांचे नांवे राष्ट्रीकृत बॅकेचा डी.डी. किंवा रेखांकित भारतीय पोस्टल ऑर्डर अर्जासोबत लावणे आवश्यक आहे.** असे न केल्यास अर्ज फेटाळण्यात येईल. |
| १६ | शासन अधिसूचना एसआरव्ही २०००/प्र.क्र (१७/२०००) बारा, दि. २८.३.२००५ नुसार नमूना अ नियम ४ प्रमाणे **लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापत्र अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे.** |
| १७ | दिनांक १ नोव्हेंबर २००५ पासून नविन परिभाषीत अंशदान निवृत्ती वेतन योजना लागू करण्यात आल्यामुळे नियुक्त करण्यात येणा-या उमेदवारास नविन परिभाषीत अंशदान निवृत्ती वेतन योजना लागू ठरेल. निवृत्ती वेतन (म्हणजे म.ना.सेवा (निवृत्ती वेतन )नियम १९८२ व म. ना.सेवा (निवृत्ती वेतनाचे अंशराशिकरण) नियम १९८४) आणि सध्या अस्तीत्वात असलेली सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना लागू होणार नाही. |
| १८ | शासकीय/निमशासकीय तसेच शासनाद्वारे चालविण्यात येणारी महामंडळे यामध्ये नोकरीत असलेल्या उमेदवारांनी नियुक्ती अधिका-याचे मुलाखतीचे वेळी ना-हरकत प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. अन्यथा मुलाखत नाकारली जाईल. |
| १९ | पुर्ण वेळ कामाचा अनुभव ग्राहय धरण्यात येईल. अर्धवेळ मानधनावरील सेवा ग्राहय धरल्या जाणार नाही. |
| २० | एका पेक्षा जास्त पदाकरीता अर्ज करावयाचा असल्यास पदनिहाय स्वतंत्र अर्ज असावा. |
| २१ | अर्जदाराने स्वत:चा **अलीकडील पासपोर्ट साईज फोटो अर्जावर चिकटवावा व त्यावर अर्जदाराने स्वत:ची स्वाक्षरी करावी.** |
| २२ | उमेदवराने जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार कार्यालयात नांव नोंदणी केली असल्यास त्याची छायांकित प्रत साक्षांकित करुन जोडणे आवश्यक. |
| २३ | उमेदवारास लेखी परीक्षा/व्यावसायीक चाचणी/मुलाखतीस उपस्थित रहण्याकरीता जाण्यायेण्याचा कोणत्याही प्रकारचा खर्च मिळणार नाही. |
| २४ | एखादया अर्जदाराने त्याच्या निवडीसाठी निवड समितीवर प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास त्यास निवड प्रक्रीयेतून बाद केले जाईल. |
| २५ | सदरहू जाहिरात **www.jdroamt.org** या संकेत स्थळावर उपलब्ध आहे. त्यानुसार सदर उमेदवाराने भरती प्रक्रिये दरम्यान सदरहू संकेतस्थळाचे संपर्कात रहावे. |

Sd

(प्र.वि.सरोदे)
सहसंचालक तंत्र शिक्षण,
अमरावती.

Created with nitroPDF professional
download the free trial online at nitropdf.com/professional